**प्रेसनोट** दि.२५/०४/२०२५

नयानगर पोलीस स्टेशन हद्दीत लोकसेवक रामनाथ ठमाजी तांदळकर पोलीस उप निरीक्षक, नेमणूक नयानगर पोलीस स्टेशन यांना लाच स्विकारतांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो/घटक | :— | ठाणे युनिट |
| पोलीस स्टेशन डायरी नोंद क्रमांक | :— | नयानगर पोलीस स्टेशन, मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय<br>पोलीस स्टेशन डायरी नोंद क्र.०२३/२१.२३ वा. दि.२५.०४.२०२५ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :— | लोकसेवक रामनाथ ठमाजी तांदळकर वय ५६ वर्षे पोलीस उप निरीक्षक, नेमणूक नयानगर पोलीस स्टेशन (वर्ग—२) रा.रुम नं.३०६ साई बिल्डींग रामदेव पार्क मिरारोड जि.ठाणे. |
| मागितलेली लाचेची रक्कम | :— | ५०,०००/— रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :— | ५०,०००/— रु. त्यात ५०००/—रुपये ५००रु.दराच्या १० भारतीय चलनाच्या नोटा व ५००/—रु.दराच्या भारतीय चिल्ड्रन बॅंक असे लिहीलेले नकली ९० नोटा |
| थोडक्यातहकीगत | :— | तक्रारदार यांचा भाऊ यास नयानगर पोलीस स्टेशनचे पोलीसांनी एम.डी. विक्री करत असतांना पकडल्यावरून त्याचे विरूध्द गुन्हा दाखल केला असून त्यात त्याला दि. १९/४/२०२५ रोजी अटक केली आहे. भाऊ रोहित याची जामीनावर सुटका करण्यासाठी व चांगला अभिप्राय (आय.ओ.टू.से.) देण्यासाठी लोकसेवक पो.उप निरी. तांदळकर यांनी तक्रारदार यांचेकडे ७००००/—रुपये लाचेची मागणी केली होती. परंतु तक्रारदार यांना लोकसेवक पो.उप निरी. तांदळकर यांना लाच दयावयाची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २३/०४/२०२५ रोजी लोकसेवक पो.उप निरी. तांदळकर हे ७०,०००/—रू. लाचेची मागणी करीत असले बाबत अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रार नोंदवली.<br>त्याप्रमाणे दिनांक २३/०४/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक पो.उप निरी. तांदळकर नेम.नयानगर पो.स्टे. यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ५०,०००/—रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी लोकसेवक पो.उप निरी. तांदळकर यांना ५०,०००/—रु. लाचेची रक्कम स्विकारताच रंगेहात पकडण्यात आले.<br>त्याबाबत नयानगर पोलीस स्टेशन येथे स्टेशन डायरी नोंद क्र.२३ वेळ २१.२३ वा. दि.२५.०४.२०२५ अन्वये नोंद घेण्यात आलेली आहे.सदर बाबत पुढील कारवाई सुरु आहे |

**<u>मार्गदर्शन अधिकारी—मा.श्री.शिवराज पाटील, सो,पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे</u>**

**मा.श्री.सुहास शिंदे सो.अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**

**मा.श्री.संजय गोविलकर सो.अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


१) संपर्क पत्ता :—लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१

२) संकेतस्थळ :—acbmaharashtra@mahapolice.gov.in

३) ई—मेल आयडी :—spacbthane@mahapolice.gov.in

४) ॲप्लीकेशन :—acbmaharashtra.net

५) टोलफ्री क्र. :— 1064

६) दुरध्वनीक्रमांक :—022--20813599


( विजय कावळे )

पोलीस निरीक्षक,

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.